# परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती

विद्यार्थी परिचारिका वसतिगृह इमारत, तळ मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

वेबसाईट: msbnpe.org ई-मेल- ppasss२०२२@gmail.com ,मो. नं: ०२२ २२६११०१५

## NURSING DIPLOMA COURSE SHIKSHAN SHULKA SAMITI

Student nurses hostel building, Ground floor, St. Georges hospital campus, p.d'melo road, Fort, Mumbai-४०० ००१

website: msbnpe.org e-mail- ppasss2022@gmail.com, mobile no- ०२२ २२६११०१५


क्र पपाअशिशुस /शिक्षण शुल्क समिती/०६३ /२०२४ दिनांक:१६/०९/२०२४

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य / संस्थाप्रमुख,
सर्व संलग्नित ए.एन.एम. व जी.एन.एम. संस्था.

**विषय :** शै.व. २०२४-२५ साठी महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाशी संलग्नित असलेले खाजगी विना- अनुदानित महाविद्यालयातील ए.एन.एम. व जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांचे शैक्षणिक शुल्क मंजूर करण्याकरिता प्रस्ताव सादर करणेबाबत.

**संदर्भ :** १. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.८९/२०/ शिक्षण-१, दिनांक.१३.१२.२०२२.
२. क्र.पपाअशिशुस /शिक्षण शुल्क समिती /इतिवृत्त /६०/२०२४, दि. ३०/०८/२०२४.

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये मंडळाशी संलग्नीत ए.एन.एम. व जी.एन.एम. संस्थांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ नुसार ए.एन.एम.,जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी "शिक्षण शुल्क समिती" गठीत करण्याबाबत शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागामार्फत निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयामध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ साठी शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी निश्चीत केलेल्या शुल्काप्रमाणे सन २०२२-२३ साठी शुल्क संरचना असावी असे नमुद करण्यात आले आहे.

संदर्भ क्र.२ नुसार २०२४-२५ करिता ए.एन.एम.,जी.एन.एम.व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमाकरिता शुल्क निर्धारित करण्यांकरिता प्रस्ताव शिक्षण शुल्क समितीकडे ndcsss.info या ऑनलाईन पोर्टलवर सादर करण्यात यावा. सदर प्रस्तावासोबत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे प्रक्रिया शुल्क रु.१५०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार फक्त), ऑनलाईन पेमेंट लिंक द्वारे जमा करावे. सदर पोर्टल दि.१७/०९/२०२४ ते दि.३१/११/२०२४ या कालावधीसाठी उपलब्ध राहील. सदर प्रस्ताव हा ऑनलाईन पोर्टलवर उपलब्ध नियमानुसार सादर करण्यात यावा.

त्याचप्रमाणे सदर प्रस्ताव आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह भौतिक स्वरुपात (Hard copy) देखील परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती यांच्या कार्यालयात हस्तबटवड्याव्दारे किंवा स्पीड पोस्ट द्वारे खालील पत्त्यावर सादर करण्यात यावा.

**"परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती,
विद्यार्थी परिचारीका वसतीगृह इमारत,
तळ मजला,सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेला रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१"**

**अध्यक्ष**
**शिक्षण शुल्क समिती,**
**तथा आयुक्त, वैद्यकीय शिक्षण विभाग**

**टीप:-** विहित नमुन्यांत लेखापरीक्षण (ऑडिटस) अहवाल,प्रतिज्ञापत्र व बँक तपशिल जोडावा.

Scanned with ACE Scanner